ePaper

# वन नेशन, वन इलेक्शनसाठी मोदी सरकारची मंजुरी!




वर्ष - 8 । अंक - 72 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 19 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- मी राजकारणात येणार नव्हते
- विराटचे ट्वीट चाहत्यांसाठी ठरले कोडे
- तिच्या जागी दुसरं कोणी असतं तर
- एक देश एक निवडणूकला विरोध!


### महाराष्ट्रवादी या हेल्पलाइनच्या माध्यमातून जोडून घेण्याचा प्रयत्न

# राज्यात बहिणीच नव्हे, भाऊही लाडके!

## अजित पवारांचं ट्विट चर्चेत, तरुणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न

। मुंबई । महाईन्यूज

**राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून 'लाडकी बहीण योजने'ची चर्चा सुरू आहे. त्यातच राज्यातील बहिणीच नव्हे, तर भाऊही लाडके असल्याचे नमूद करीत तरुणांसाठीच्या विविध योजना अधोरेखित करण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेस करीत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'एक्स'वर व्हिडीओ पोस्ट करून युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत मिळणाऱ्या प्रशिक्षण आणि १० हजार रुपये विद्यावेतनाची माहिती दिली आहे. राज्यातील तरुणांना महाराष्ट्रवादी या हेल्पलाइनच्या माध्यमातून पक्षाशी जोडून घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**



अजित पवार यांनी 'लाडक्या भावां'च्या योजनेचा एक व्हिडीओ बुधवारी सकाळी ट्विट केला. 'योजनांची नांदी जशी बहिणींसाठी... तशीच भावांसाठीसुद्धा...' असे नमूद करीत, अजित पवारांसाठी सगळेच लाडके आहेत, अशा आशयाची ही जाहिरात आहे. राज्यातील तरुणांसाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या योजनांची माहिती त्यात देण्यात आली आहे. या योजनांबद्दल कोणतीही अडचण असेल तर आमचा महाराष्ट्रवादी व्हॉट्सॲप हेल्पलाइन क्रमांक ९८६१७१७१७१ तुमच्या मोबाइलमध्ये सेव्ह करून घ्या,' असे आवाहन त्यात करण्यात आले आहे.

### तरुण मतदारांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न

लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून महायुती सरकारमधील तिन्ही घटकपक्ष या योजनांचे श्रेय लाटण्यासाठी जोरदार प्रयत्न करीत असतानाच आता राष्ट्रवादीने तरुणांसाठी असलेल्या योजनांची माहिती पक्षाच्या हेल्पलाइनच्या माध्यमातून देण्याचे नियोजन केले असून, या माध्यमातून तरुण मतदारांना आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न सुरू असल्याची जोरदार चर्चा आहे. मुख्यमंत्रिपदासाठी १४५चा मॅजिक आकडा'सर्वच कार्यकर्त्यांना वाटते की, आपापला नेता हा मुख्यमंत्री व्हावा. पण सर्वांची इच्छा पूर्ण होते, असे होत नाही. मुख्यमंत्रिपदासाठी १४५चा मॅजिक आकडा पार करावा लागतो. दुसरी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे कोणाला मतदान करायचे आहे, हे मतदार राजा याच्या हातात असते,' अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात मंगळवारी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मानाच्या गणपतींचे पूजन करून विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ झाल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

### अजित पवारांनी महायुतीचा फॉर्म्युला सांगितला

विधानसभा निवडणुकीतील जागावाटपाबाबत चर्चा करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांची २४ आणि २५ सप्टेंबर रोजी दोन दिवसीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. महायुतीत ज्या जागांवर रस्सीखेच आहे, त्या जागांवर यावेळी चर्चा होणार आहे. त्यावर तोडगा न निघाल्यास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात दिल्ली दरबारी महायुतीच्या दिग्गज नेत्यांची बैठक होणार आहे. अजित पवारांची राष्ट्रवादी विधानसभेच्या ७० हून जास्त जागा लढणार असल्याची माहिती मिळत आहे. राष्ट्रवादीच्या तिकिटावर गेल्यावेळी ५४ आमदार निवडून आले होते. सीटिंग आमदारांना पुन्हा संधी देण्याचा कल असेल. मात्र एखाद्या आमदाराचा सर्व्हे निगेटिव्ह आला, तर त्या जागेवर त्याच पक्षातील दुसऱ्या उमेदवाराला तिकीट देण्यात येईल, असं महायुतीच्या नेत्यांचं ठरलं आहे. या व्यतिरिक्त राष्ट्रवादीची ताकद अधिक असलेल्या किमान १६ जागा पदरात पाडून घेण्यात अजित पवार यांना यश आल्याचं दिसत आहे. 'सर्वच कार्यकर्त्यांना वाटते की, आपापला नेता हा मुख्यमंत्री व्हावा. पण सर्वांची इच्छा पूर्ण होते, असे होत नाही. मुख्यमंत्रिपदासाठी १४५चा मॅजिक आकडा पार करावा लागतो. दुसरी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे कोणाला मतदान करायचे आहे, हे मतदार राजा याच्या हातात असते,' अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात मंगळवारी व्यक्त केली.

# 'सचिन तेंडुलकर 'पिच'वरून 'चीप'वर आले'!

## नवी मुंबई येथे सेमीकंडक्टर चीप प्रकल्पाच्या उदघाटनप्रसंगी एकनाथ शिंदेंची टोलेबाजी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भारतरत्न सचिन तेंडुलकर यांना क्रिकेटचे देव म्हटले जाते. शोएब अख्तर असू दे नाहीतर कोणताही वेगवान गोलंदाज असू द्या, त्यांनी प्रत्येक गोलंदाजाला चौकार, षटकार मारलेले आहेत. पण ते पिचवरून 'चीप'वर कधी




आले कळलेच नाही, अशी टोलेबाजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई येथे सेमीकंडक्टर चीप प्रकल्पाच्या उदघाटनप्रसंगी केली. मराठी माणूस युनिक, अद्ययावत आणि वेगळ्या क्षेत्रात क्रांती घडविण्याचे काम करत आहे. यामुळेच राज्य सरकार आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या पाठीशी आहे.

### मविआ सरकारमुळे उद्योग राज्याबाहेर गेले

"विरोधकांकडून सातत्याने उद्योग पळाले, अशी टीका केली जाते. पण एका महिन्यात किंवा वर्षात उद्योग येत नाही. कोणत्याही उद्योगाला आणण्यासाठी खूप तयारी करावी लागते. जे उद्योग गेले, त्यांना महाराष्ट्रात कामच करायचे नव्हते. कारण राज्य सरकारकडून त्यांना जे सहकार्य मिळायला हवे होते, ते मिळाले नाही", असा आरोप एकनाथ शिंदे यांनी केला. आमचे सरकार आल्यानंतर आता अनेक उद्योग राज्यात येत आहेत.

# ‘डीजे’चा दणदणाट त्रासदायकच ठरला!

## बुधवारच्या सकाळी सर्वाधिक आवाजाची नोंद

। पुणे ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीमध्ये यंदा गतवर्षीपेक्षा कमी आवाजाची नोंद झाली आहे. गेल्यावर्षी लक्ष्मी रोडवर १०१.२ डेसिबल आवाजाची पातळी होती, तर यंदा ती कमी होऊन ९४.८ डेसिबल नोंदवली गेली. पण तरी देखील लोकांना जो काही आवाज कानी पडला, तो त्रासदायकच ठरला, अशा प्रतिक्रिया काही पुणेकरांनी दिल्या. मंगळवारच्या रात्रीपेक्षाही बुधवारच्या सकाळी सर्वाधिक आवाजाची नोंद झाली.**



दुपारी १२ वाजता तर बेलबाग व होळकर चौकात ११८.५ डेसिबलची नोंद झाली आहे.गेल्या २४-२५ वर्षांपासून ‘सीओइपी’ तंत्रज्ञान विद्यापीठातर्फे लक्ष्मी रोडवरील प्रमुख दहा चौकांमध्ये ध्वनी पातळीची नोंद होते. ही नोंद सीओइपीच्या उपयोजित विज्ञान आणि मानव्यविद्या विभागाचे प्रमुख डॉ. महेश शिंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होते. त्यामध्ये इरा कुलकर्णी, मेहर रघाटाटे, मृणाल खुटेमाटे, ईशिता हुम्नाबादकर, आयुष लोहकरे, आदित्य फाळके, आदित्य संजीवी, तेजस जोशी, मोहित कंडाळकर आदींनी सहभाग नोंदवला. शास्त्रीय पद्धतीने ही नोंद झाली. लक्ष्मी रोडवर २४ तासांतील १० चौकांमध्ये नोंद झाली.लक्ष्मी, केळकर, कुमठेकर, टिळक या चारही रस्त्यांवर ढोल ताशा सोबत डीजेचा दणदणाट ऐकण्यास मिळाला. पोलिसांनी आवाजाची मर्यादा सांगितली असूनही मंडळांनी ती ओलांडून स्पीकर लावले होते. कर्णकर्कश आवाजाबरोबच जोरदार दणकेही गाण्यांमधून बसत होते. असंख्य पुणेकरांनी डीजेच्या दणदणाटावर नाराजी व्यक्त केली असून त्रासदायक असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. पोलिस आणि प्रशासनाने पहिल्या दिवशी रात्रीपर्यंत केवळ मर्यादित डीजे वादनाला परवानगी दिली आणि अधिकाधिक पारंपरिक वाद्यांच्या गजरात लक्ष्मी रोडवर आली. परंतु, सकाळी ८ वाजल्यानंतर मात्र अनेक मंडळांनी दणदणाट सुरू केला. रात्रीपेक्षा बुधवारी (दि.१८) सकाळचा आवाज सर्वाधिक नोंदवला गेला.ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजण्याचा पर्यावरणसंवेदी कार्याचा यंदा रौप्यमहोत्सव आहे. आम्ही २००१ पासून हे कार्य करतोय. लक्ष्मी रोडवरील प्रत्येक चौकातील आवाज आम्ही नोंदवतो. यंदा ध्वनी पातळी किती असेल, याची उत्सुकता होती. गेल्या वर्षी तुलनेत ती कमीच नोंदली गेली.प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे ध्वनी प्रदूषणाची नोंद केली. गतवर्षीपेक्षा ती कमीच नोंदली गेली. शिवाजीनगर ८५.६, सातारा रोड ८२.७, सारसबाग ८८.९, हडपसर ८२.४, विश्रांतवाडी ८१.३ डेसिबलची नोंद पहायला मिळालीदुपारी १२ वाजता तर बेलबाग व होळकर चौकात ११८.५ डेसिबलची नोंद झाली आहे.गेल्या २४-२५ वर्षांपासून ‘सीओइपी’ तंत्रज्ञान विद्यापीठातर्फे लक्ष्मी रोडवरील प्रमुख दहा चौकांमध्ये ध्वनी पातळीची नोंद होतेत्यामध्ये इरा कुलकर्णी, मेहर रघाटाटे, मृणाल खुटेमाटे, ईशिता हुम्नाबादकर, आयुष लोहकरे, आदित्य फाळके, आदित्य संजीवी, तेजस जोशी, मोहित कंडाळकर आदींनी सहभाग नोंदवला.

### मर्यादित डीजे वादनाला परवानगी

लक्ष्मी रोडवर २४ तासांतील १० चौकांमध्ये नोंद झाली. लक्ष्मी, केळकर, कुमठेकर, टिळक या चारही रस्त्यांवर ढोल ताशा सोबत डीजेचा दणदणाट ऐकण्यास मिळाला. पोलिसांनी आवाजाची मर्यादा सांगितली असूनही मंडळांनी ती ओलांडून स्पीकर लावले होते. कर्णकर्कश आवाजाबरोबच जोरदार दणकेही गाण्यांमधून बसत होते. असंख्य पुणेकरांनी डीजेच्या दणदणाटावर नाराजी व्यक्त केली असून त्रासदायक असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. पोलिस आणि प्रशासनाने पहिल्या दिवशी रात्रीपर्यंत केवळ मर्यादित डीजे वादनाला परवानगी दिली आणि अधिकाधिक पारंपरिक वाद्यांच्या गजरात लक्ष्मी रोडवर आली.

# कामाच्या ताणामुळेच माझ्या लेकीचा मृत्यू

## आईने बॉसला धरलं जबाबदार; पत्र सोशल मीडियावर व्हायरल

।पुणे।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुण्यातील एका २६ वर्षीय तरुणीच्या मृत्यूनंतर ती ज्या कंपनीत काम करत होती त्या कंपनीवर समाजमाध्यमांवरून टीकेचा भडीमार होऊ लागला आहे. चार्टर्ड अकाउंटंट असलेल्या या तरुणीच्या आईने तिच्या कार्यालयातील वरिष्ठांवर गंभीर आरोप केले आहेत.**

मृत तरुणीच्या आईने म्हटलं आहे की “तिचे कार्यालयातील वरिष्ठ तिला इतकं काम द्यायचे की ती गेल्या काही दिवसांपासून खूप तणावात होती. तिच्यावर कामाचं प्रेशर टाकलं जात होती. कामाच्या ओझ्याखाली असलेली आमची लेक मरण पावली आहे”. या तरुणीने मार्च २०२४ मध्ये ईवाय पुणे या कंपनीत काम करण्यास सुरुवात केली होती. जुलै महिन्यात तिचं निधन झालं. मात्र मृत तरुणीच्या आईने लिहिलेल्या एका भावूक पत्रामुळे ईवाय कंपनी, तिथल्या कामाची पद्धत चर्चेचा मुद्दा बनली आहे.ॲना सेबेस्टियन पेरायिल असं या निधन झालेल्या चार्टर्ड अकाउन्टंट तरुणीचं नाव आहे. ॲना सेबेस्टियनच्या आई



अनीता ऑगस्टीन यांनी ई. वाय. इंडिया कंपनीचे अध्यक्ष राजीव मेमानी यांना एक पत्र लिहिलं आहे. या पत्राद्वारे त्यांनी मेमानी यांना विनंती केली आहे की “माझ्या मुलीला न्याय मिळायला हवा”असल्याचं ऑगस्टीन यांनी नमूद केलं आहे.अनीता यांनी पत्रात लिहिलं आहे की “मी एक दुखी आणि पीडित आई म्हणून हे पत्र लिहितेय. मी माझी मुलगी गमावली आहे. माझी मुलगी १९ मार्च २०२४ रोजी तुमची कंपनी ई. वाय. इंडियामध्ये कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू झाली होती. चार महिन्यांनंतर २० जुलै रोजी मला एक धक्कादायक वृत्त मिळालं की माझी लाडकी लेक आता या जगात नाही. ती केवळ २६ वर्षांची होती.ऑगस्टीन म्हणल्या, “कामाचं ओझं, नवीन वातावरण आणि कामाचे अधिक तास यामुळे ॲना शरिराने व मनाने थकली होती.

### लेकीवर अधिक कामाचं ओझं टाकलं

चिंता, निद्रानाश आणि तणावाने ती खचून गेली होती. कठोर परिश्रम व चिकाटी ही यशाची गुरुकिल्ली आहे यावर विश्वास ठेवून ती स्वतःला झोकून देऊन काम करत होती. ज्याने तिचं आयुष्य हिरावलं. ॲना ज्या टीममध्ये काम करत होती तिथे कामाचं खूप प्रेशर होतं. त्यामुळे त्या टीममधील तिच्या अनेक सहकाऱ्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आहे. ॲनाचे टीम लीडर तिला प्रोत्साहित करत होते, तू आपल्या टीमची प्रतिमा बदलायला हवी. ॲनाला जरादेखील विश्रांती मिळत नव्हती. रात्री उशिरापर्यंत ती काम करत असायची, सुट्टीच्या दिवशी देखील तिला कामं सांगितलं जात होती. ज्या टीम लीडर व व्यवस्थापकाने माझ्या लेकीवर अधिक कामाचं ओझं टाकलं.

# दिघी, चिखलीतील विजेचा प्रश्न निकाली!

## आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते वीजवाहिन्यांच्या कामाचा शुभारंभ

। भोसरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदारसंघातील दिघी, चिखली, जाधववाडी, सोनवणेवस्ती परिसरातील विजेचा प्रश्न निकाली निघणार आहे. आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते भूमीगत वीजवाहिन्या टाकणे, रोहित्राची क्षमता वाढविण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाणही घटणार आहे. चिखलीतील सोनवणेवस्तीमधील रोहित्राची क्षमता वाढविण्यात येणार आहे. तेथे 315 ऐवजी 630 केव्हीचा रोहित्र बसिण्यात येत आहे. राम मंदिर, गाथा कॉलनी, पाटीलनगर भागातील विद्युत वाहिनी भूमीगत टाकण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी होणार आहे.**



विकास आश्रम, चिखली गावठाण येथे अतिभारीत विद्युत वाहिनीस पर्यायी केबल टाकण्यात येत आहे. चिखली भागासाठी नवीन फिडरपीळ बसविण्यात येत आहे. सोनवणे वस्तीमधील जुन्या झालेल्या वाहिन्या बदलल्या जाणार आहेत. तिथे नवीन वाहिन्या टाकल्या जाणार आहेत. शेलारवस्ती, आंबेडकर भवन येथील वाहिन्या भूमिगत टाकल्या जाणार आहेत.

जाधववाडीतील बोल्हाईमळा येथे नवीन ट्रान्सफार्मर उऊारण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे या भागातील वीजपुरवठा सुरळीत होणार आहे. दिघीतील साई पार्क, माऊलीनगर परिसरातील वीज वाहिन्या भूमिगत करण्यास सुरुवात झाली आहे.

> समाविष्ट भागातील विविध गावांमधील रोहित्रांची क्षमता कमी होती. जास्त क्षमता असलेले रोहित्र बसविण्यास सुरुवात झाली आहे. अनेक भागातील विद्युत वाहिन्या रस्त्यावर होत्या. त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारत येत नाही. त्यासाठी विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याच्या कामाला प्रारंभ केला आहे. यामुळे सातत्याने वीज पुरवठा खंडित होणार नाही.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा.

# पर्यावरण पूरक कृत्रिम तलावास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## संदीप वाघेरे आयोजित उपक्रमामध्ये 4,192 मूर्तींचे विसर्जन



। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या आवाहनाला नागरिकांनी भरघोस प्रतिसाद देत मूर्ती विसर्जन केंद्रावर ४१९२ गणेशमूर्तींचे विसर्जन केले.**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा व्हावा म्हणून गणेशमूर्ती विसर्जन व संकलन केंद्राची निर्मिती करण्यात आली होती. सलग ६ वर्ष सुरु असलेल्या या उपक्रमास नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. यंदाच्या वर्षी गणेशमूर्ती विसर्जनासाठी दोन कृत्रिम हौदांची निर्मिती करण्यात आली होती. याच बरोबर गणेश विसर्जन व संकलन सुरळीतपणे पार पडणेकामी ३० स्वयंसेवक, २ जीवरक्षक तसेच निर्माल्य जमा करणेकामी निर्माल्य कलश यांची व्यवस्था करण्यात आली होती. महापालिकेच्या वतीने निर्माल्य कलश व सफाई कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. दिनांक ७ सप्टेंबर २०२४ ते १७ सप्टेंबर २०२४ दरम्यान सकाळी ८ ते रात्री १२ या कालावधीमध्ये नागरिकांनी मूर्ती विसर्जन व संकलन केंद्राचा लाभ घेतला. विसर्जन केंद्रावर येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून पिंपरी पोलीस स्टेशन व वाहतूक शाखा पिंपरी यांचे देखील सहकार्य लाभले. संकलित केलेल्या गणेशमूर्तींचे महापालिकेने ठरवून दिलेल्या जागेमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने विसर्जन केले जाणार आहे अशी माहिती संदीप वाघेरे यांनी दिली. कार्यक्रमाचे नियोजन सचिन वाघेरे, रंजनाताई जाधव, शेखर अहिरराव, गणेश मंजाळ, पवन हिरवे, सारथी काळे यांनी केले.



# फिनिक्स मॉलच्या समोर गोळीबार करणाऱ्या आरोपीला अटक

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरी-चिंचवडमधील वाकडच्या फिनिक्स मॉल समोर हवेत गोळीबार करणाऱ्या बाला शिंदे नावाच्या व्यक्तीला वाकड पोलिसांनी अटक केली आहे.

पिंपरी-चिंचवडमधील वाकडच्या फिनिक्स मॉल समोर हवेत गोळीबार करणाऱ्या बाला शिंदे नावाच्या व्यक्तीला वाकड पोलिसांनी अटक केली आहे. अक्षय उर्फ बाला लहू शिंदे असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. माथाडीचं काम न मिळाल्यामुळे हवेत गोळीबार केल्याचे पोलीस तपासात समोर आल आहे. अक्षय उर्फ बाला शिंदे हा सराईत गुन्हेगार आहे.

मंगळवारी वाकड परिसरात असणाऱ्या फिनिक्स मॉल गेट नंबर सात या ठिकाणी बाला शिंदे याने हवेत गोळी झाडून दहशत पसरवली होती. गणपती विसर्जनाच्या दिवशी घटना घडल्याने पोलिसांची देखील धावपळ झाली होती. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन सीसीटीव्ही ताब्यात घेऊन आरोपीचा अवघ्या काही तासांत शोध लावला आहे. गुन्ह्यात वापरण्यात आलेली कार आणि कारचालक रणजीत नथुराम सलगर याला देखील गुन्हे शाखा युनिट चारने भुमकर चौकातून अटक केली आहे. हा गोळीबार माथाडीचं काम न मिळाल्यामुळे केल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. हवेत गोळीबार करून आरोपी बाला शिंदेने दहशत निर्माण केली होती. तशी कबुली त्याने पोलिसांकडे दिली आहे.



## भूमिका

# भाजपचे हरियाणातील 'काँग्रेसी वळण'

**शिस्तप्रिय पक्ष अशी प्रतिमा भाजपने जपली, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व आल्यापासून पक्षातील शिस्त अधिकच कडक झाली. नेतृत्वाच्या विरोधात बोलणे सोडा, खासगीतही मतप्रदर्शन करण्याची कोणाची टाप राहिली नाही. मुख्यमंत्री किंवा मंत्रीपदावरून रातोरात हटविण्यात आले तरी 'हू' की 'चू' करण्याची हिम्मत कोणी दाखवली नाही.**

मोदी-शहा यांच्या गुजरातमध्ये विजय रुपाणी यांच्यासह सर्व मंत्रिमंडळाला नारळ देण्यात आला, कोणत्याही मंत्र्याचा नवीन मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात फेरसमावेश झाला नाही. नितीन पटेल यांच्यासारख्या ज्येष्ठ मंत्र्यालाही घरी बसविण्यात आले. पण कोणीही नेतृत्वाच्या निर्णयाच्या विरोधात प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे धाडस केले नाही. जमिनीच्या कथित गैरव्यवहारावरून एकनाथ खडसे यांचा मंत्रीपदाचा राजीनामा घेण्यात आला. त्यानंतर खडसे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात तोफ डागली; पण त्याची किंमत खडसे यांना आजही चुकवावी लागत आहे. खडसेंचे जावई 'ईडी'चा पाहुणचार घेऊन आले. उत्तराखंडमध्ये सहा महिन्यांत तीन मुख्यमंत्री बदलले पण कोणी काही विरोधी भूमिका घेतली नाही. राजस्थानमध्ये वसुंधराराजे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला मुख्यमंत्रीपद नाकारले तरीही त्यांनीही केंद्रीय नेतृत्वाबद्दल



उघडपणे नाराजी व्यक्त केली नव्हती. मोदी-शहा यांची जरबच तेवढी होती.एवढी शिस्त असूनही लोकसभा निवडणुकीत भाजपच्या खासदारांचे संख्याबळ ६३ने घटले. भाजपची गाडी २४०पर्यंत अडकल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांवर सारी भिस्त आली. भाजपचा जनाधार आटला तसा पक्षातील नेतृत्वाचा धाकही कमी झाला की काय, अशी शंका घेण्यासारखे प्रसंग हरियाणात घडत आहेत.हरियाणा विधानसभा निवडणुकीचे वारे सध्या वाहात आहेत. भाजपपुढे सत्ता कायम राखण्याचे कडवे आव्हान उभे ठाकले आहे. लोकांची सरकारबद्दलची नाराजी वाढल्यानेच लोकसभा निवडणुकीपूर्वी मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून नायबसिंह सैनी यांची मुख्यमंत्रीपदी निवड केली. 'विधानसभा निवडणुकीत सैनी यांचाच चेहरा मुख्यमंत्रीपदासाठी असेल,' असे पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने जाहीर केले. सहा महिने झाले तरी सैनी अजूनही स्थिरस्थावर होऊ शकलेले नाहीत. भाजपच्या अडचणींमध्ये वाढ झाली असतानाच हरियाणा भाजपमधील ज्येष्ठ नेते अनिल विज यांनी थेट मुख्यमंत्रीपदावर दावा केला आहे. विज हे एकमेव नव्हेत. केंद्रीय मंत्री राव इंद्रजीतसिंह यांनीही उघडपणे मुख्यमंत्रीपदाची इच्छा व्यक्त केली आहे. भाजपच्या मोदी – शहांच्या कारकीर्दीत प्रथमच पक्षातील कोणी नेत्याने उघडपणे मुख्यमंत्रीपदावर दावा केला आहे. यापैकी राव इंद्रजीतसिंह हे काँग्रेसमधून भाजपवासी झाल्याने त्यांच्या अंगी काँग्रेस संस्कृती कदाचित कायम असावी. पण विज तर मूळचे भाजपचे. भाजपचे सर्वात ज्येष्ठ आमदार. २०१४ मध्ये भाजपला सत्ता मिळाली तेव्हाच अनिल विज यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी घेतले जात होते. पण गेली दहा वर्षे त्यांना पक्षात दुय्यम भूमिकेत वावरावे लागले. गृहसारखी महत्त्वाची खाती भूषवताना विज नेहमीच वादात राहिले. विक्षिप्त स्वभावाच्या विज यांनी आपल्या विधानांवरूनही पक्षाला अडचणीत आणले होते. सैनी यांची मुख्यमंत्रीपदावर निवड होतानाही विज यांनी आक्षेप घेतला होता. यामुळेच बहुधा मंत्रिमंडळात त्यांना स्थान देण्यात आले नव्हते. पण आता 'मला मुख्यमंत्री करण्यासाठी भाजपला मत द्या' असा प्रचारच केंद्रीय नेतृत्वाला डावलून विज यांनी आरंभला आहे. याआधी जम्मू आणि काश्मीरमध्ये, जाहीर केलेली उमेदवारांची यादी काही तासांतच मागे घेण्याची नामुष्की भाजपवर आली होती. हेदेखील थेट नेतृत्वालाच आव्हान होते. येडियुरप्पा किंवा वसुंधराराजे यांच्यासारख्या दिग्गजांचा पद्धतशीरपणे काटा काढणाऱ्या भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाला हरियाणा किंवा जम्मू आणि काश्मीरमध्ये आव्हान मिळते आहे. भाजपचे हे काँग्रेसीकरण तर नाही ना? नेतृत्वाची जरब कमी झाली असावी वा नेतेमंडळींची हिम्मत वाढली असावी. काँग्रेसप्रमाणे भाजपच्या मुख्यालयात समर्थकांकरवी कोणी झिंदाबादचे नारे दिले नाहीत.

## प्रासंगिक »

# दोन ध्रुवांवर दोघे

***केंद्राकडून मिळणाऱ्या अर्थवाट्यात वाढ व्हायला हवी आणि केंद्र-पुरस्कृत योजनांत कपातही व्हायला हवी, हे मुद्दे १६ व्या वित्त आयोगापुढे मांडले जात आहेत..***

तमिळनाडूच्या एका हॉटेलचालकाने 'वस्तू-सेवा करा'तील विसंवादाबाबत प्रश्न विचारण्याची 'जुर्रत' केली म्हणून अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यास 'कसे नमवले' याची चर्चा सुरू होण्याच्या आधी दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक कर्नाटकात आणि दुसरी केरळमध्ये. त्याची दक्षिणी राज्यांतील माध्यमांनी रास्त दखल घेतली. अन्य अनेकांचे त्याकडे दुर्लक्ष झाले. वा त्यांनी केले. यातील एक घटना कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आठ राज्यांस लिहिलेले पत्र ही आहे तर दुसऱ्या घटनेचा संदर्भ केरळच्या अर्थमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीशी आहे. कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी लिहिलेले पत्र केरळ, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा या चार दक्षिणी राज्यांशिवाय महाराष्ट्र, गुजरात, हरयाणा आणि पंजाब या राज्यांस उद्देशून आहे. सिद्धरामय्या या सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांस एका मंचावर आणून एक मुद्दा मांडू इच्छितात.

१७ सप्टेंबर रोजी आपण मराठवाडा मुक्ती संग्राम दिवस साजरा करतो... १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वातंत्र्याच्या तब्बल १३ महिन्यानंतर मराठवाडा आणि हैद्राबाद संस्थान हे खऱ्या अर्थाने भारतमातेसोबत एकरूप झाले याची आपणास माहिती आहे.

# महाराष्ट्रात शेतीसाठी 'जैविक संग्राम' हवा!

पण १७ सप्टेंबर रोजी असाच एक महत्त्वाचा दिवस आहे आणि भारतातच नव्हे, अन्य आशियाई देशांतही त्याकडे कायम दुर्लक्ष केले जाते. १७ सप्टेंबर हा 'आंतरराष्ट्रीय सूक्ष्मजीव दिन' (इंटरनॅशनल मायक्रोऑरगॅनिझम्स डे) म्हणून युरोपात मात्र आवर्जून साजरा केला जातो. वास्तविक सूक्ष्मजीव हे काय आहेत आणि याची ताकत काय आहे हे साऱ्या जगाने करोनाकाळात पाहिले आहे आणि याचा अनुभव आपल्याला आला आहे. हे सूक्ष्मजीव प्रत्येक क्षेत्रात आहेत असे म्हटले तरी वावग ठरणार नाही . वैद्यकीय क्षेत्राप्रमाणेच, कृषी क्षेत्रातील सूक्ष्मजीवांचा आपल्या जगण्याशी संबंध आहे! यामुळे भारतीयांनी या दिवसाबद्दल सजग व्हायला हवे. जगाचा पोशिंदा असलेल्या आपल्या शेतकरी बांधवांचा मोठा वाटा मानवी आरोग्य टिकवण्याच्या कामी आहे, हे कोणी नाकारू शकत नाही. शेतीत पिकवलेले अन्नधान्य सकस असेल तरच आरोग्य टिकण्याची शक्यता



वाढेल. ही सकस शेतीदेखील अनेक सूक्ष्मजीवावर अवलंबून आहे... जसे मराठवाड्याला निजामाच्या तावडीतून १७ सप्टेंबर रोजी सोडवले तसेच आपल्याला आज दिवसेंदिवस बेसुमार वापर होत असलेल्या हानिकारक रासायनिक शेतीपासून मुक्त होण्याची गरज आहे. आपल्याला आपल्या मातीतील सूक्ष्मजीव जे कसे जिवंत ठेवता येतील याकडे प्राधान्यक्रमाने लक्ष द्यायला हवे. आपल्या मातीची खरी गरज काय आहे हे आपण पाहत नाही. बेसुमार रासायनिक खते आणि औषधे यांचा आपण वापर करत आहोत आणि आपणच आपल्या मातीचा पोत बिघडवत आहोत, रासायनिक खतांचा बेसुमार वापर करून आपण भूमिप्रदूषण वाढवले आहे याचा फटका आपल्याला बसत आहे कारण यामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या लोप पावत आहे आणि जे सूक्ष्मजीव आपल्या जमिनीला भुसभुशीत ठेवतात त्यांची आपण हत्या करत आहोत. आपल्या पणजोबा किंवा आजोबा यांनी लाकडी नांगराने शेती नांगरली आणि शेती केली मग आपल्या वडिलांनी शेती हा लाकडी नांगर सोडून लोखंडी नांगर वापरला आणि आत्ता आपली पिढी ही ट्रॅक्टरवर नांगरणी करत आहे... येणारी पिढी पुढील काही वर्षात जेसीबीच्या साह्याने नांगरणी करेल आणि काही काळाने आपल्या जमिनीत गवतसुद्धा उगवणार नाही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते, कारण त्या जमिनीला सूक्ष्मजीवरहित जमीन हे आपणच बनवणार! शेती/ जैविक शेती बाबत स्वप्न पाहिले आहे आणि आपण सर्वांनी उज्ज्वल भविष्यासाठी त्यासाठी काम करायला हवे आवाहन केले आहे... पण याला आपला कृषिविभाग आणि त्यातील अधिकारी कितपत साथ देतात?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भाजपामध्ये संधीसाधुपणाला 'मार्केट'

# अन् शहराध्यक्ष शंकर जगताप 'टार्गेट'!

## जगताप कुटुंब एकसंघच, पण नसलेला वाद उफाळून काढण्याचा प्रयत्न

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील मातब्बर घराणे जगताप कुटुंबियांमधील कथित वादाचे भांडवल करुन महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमधील प्रवेश सुलभ करण्यासाठी भाजपामधील काही माजी नगरसेवकांकडून 'ब्लेम गेम' सुरू झाला आहे. त्यासाठी जगताप कुटुंबामध्ये नसलेला वाद उकरुन काढण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**




दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर चिंचवड विधानसभेकरिता मार्च-२०२२ मध्ये पोटनिवडणूक झाली. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा होती. तसे आवाहनही पक्षश्रेष्ठींकडून करण्यात आले होते. मात्र, चिंचवडमधील भाजपाच्या माजी नगसेवकांमधील एका गटाच्या अट्टाहासामुळे ही निवडणूक झाली. या निवडणुकीत भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांना तिकीट पक्षश्रेष्ठींकडून मिळेल, असे ठरले होते. पण, कौटुंबिक वाद कौटुंबिक पातळीवर मिटवत शंकर जगताप यांनी एबी-फॉर्म अश्विनी जगताप यांच्या नावाने भरला. त्यावेळी झालेली अतितटीची निवडून शंकर जगताप यांनी जिंकून आणली. अन्यथा कसबा मतदार संघाप्रमाणे भाजपाला ही जागा गमवावी लागली असती, ही वस्तुस्थिती आहे.

भारतीय जनता पार्टीचा शहराध्यक्ष म्हणून काम करीत असताना शंकर जगताप यांनी जुने-नवे असा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, अतिमहत्त्वाकांक्षी नेत्यांचा अपेक्षांची पूर्तता करणे त्यांना शक्य झाले नाही. त्यामुळे शहराध्यक्ष झाल्यापासूनच त्यांच्याविरोधात राजकीय कुरघोड्या सुरू झाल्या होत्या. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर या कुरखोडींना आणखीच जोर चढला.

विद्यमान आमदार अश्विनी जगताप आणि शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्यामध्ये राजकीय सत्तासंघर्ष नाही. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत शंकर जगताप यांना भाजपाच्या उमेदवारीचा मार्ग मोकळा झाला आहे. शंकर जगताप आमदार झाल्यास आगामी २० वर्षे राजकीय महत्त्वाकांक्षी नेत्यांनी संधी मिळणार नाही. कारण, उत्तम व्यवस्थापन कौशल्य आणि राजकीय डावपेच याची जाण असलेले शंकर जगताप त्यांचे राजकीय गुरू दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या तालमीत तयार झाले आहेत. "भाजपाच्या सत्ताकाळात महत्त्वाच्या पदांवर संधी दिली नाही. पक्षात शहराध्यक्षांची मनमानी कारभार सुरू आहे. आम्ही पक्षासाठी रात्रंदिवस मेहनत घेतली. पण, पक्षश्रेष्ठींपर्यंत आमची ओळख नाही..." असे अनेक आरोप आजच्या घडीला भाजपाला सोडचिठ्ठी देणाऱ्या माजी नगरसेवकांकडून केले जात आहेत. मात्र, भाजपाची सत्ता २०१७ ते २०२२ या काळात होती. त्या काळात दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप पदवाटपाबाबत निर्णय घेत होते. त्यांच्या निधनानंतर शंकर जगताप शहराध्यक्ष झाले आहेत. त्यामुळे महापालिकेतील महत्त्वाची पदे दिली नाहीत, असे म्हणणे व्यवहार्य नाही. दुसरीकडे, आम्ही दिवंगत लक्ष्मण जगताप यांचे समर्थक आहोत, पण शंकर जगताप यांना मानत नाही, असे म्हणणेही परस्पर विरोधी आहे. कारण, लक्ष्मण जगताप यांनी भाजपाचे तिकीट दिले नसते, तर अनेकांना महापालिका सभागृहात संधीच मिळाली नसती, ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

### प्रसारमाध्यमांमध्ये 'स्पेस' मिळवण्याचा प्रयत्न...

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप पुण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. ज्या लक्ष्मण जगताप यांनी काही लोकांना ताकद दिली. राजकारण आणि व्यावसायात स्थिरस्थावर केले. नगरसेवक बनवले. शक्य त्यांना पदे दिली. स्वतःच्या भावाप्रमाणे वागवले. ते लक्ष्मण जगताप शेवटच्या घटका मोजत असताना काही माजी नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संपर्कात होते. त्यावेळीपासून संबंधित राजकीय महत्त्वाकांक्षी लोकांकडून शंकर जगताप यांना 'टार्गेट' केले आहे. शंकर जगताप शहराध्यक्ष नसते, तर कदाचित आमदार अश्विनी जगताप यांच्यावरही आक्षेप घेतला असता. ज्या लोकांनी जगताप कुटुंब फोडण्याचा प्रयत्न केला. आजच्या घडीला जगताप कुटुंब अभेद्य असल्याचे लक्षात आल्यानंतर अस्वस्थ झालेल्या लोकांकडून "मी लक्ष्मणऊंचा समर्थक आहे" असा दावा केवळ भाजपा आणि शंकर जगताप यांना 'डॅमेज' करण्यासाठी केला जातो आहे. त्याद्वारे प्रसारमाध्यमांमध्ये 'स्पेस' मिळवण्याचा खटाटोप सुरू आहे. वास्तविक, शंकर जगताप यांनी त्या-त्या प्रभागामध्ये नवोदित 'पर्याय' तयार केले आहेत. त्यामुळे काही मान्यवरांची अस्वस्थता वाढली आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

---

# 'स्वराज्य'मध्ये नागरिकांना मिळवून दिले हक्काचे पाणी!

## अजित गव्हाणेंकडून वसंत बोराटेंच्या कामाचे तोंड भरुन कौतुक

। भोसरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



मोशी, बोराटेवस्ती येथील स्वराज्य हाऊसिंग सोसायटीमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. तब्बल 605 सदनिकाधारक या पाणीटंचाईने वैतागले होते. या प्रश्नाला मार्गी लावण्याचा "विडा" माजी नगरसेवक वसंत बोराटे यांनी उचलला होता. प्रशासकीय संघर्ष पार पाडत अखेर स्वराज्य सोसायटीमध्ये नागरिकांच्या हक्काचे पाणी अक्षरशः खेचून आणले. त्यांच्या या प्रयत्नांचे तोंड भरून कौतुक माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले.

तर अजित गव्हाणे यांच्या पुढाकारातून प्रश्न मार्गी लागल्याची भावना बोराटे यांनी व्यक्त केली. सोसायटीतील स्वराज्य गणेश मित्र मंडळाच्या वतीने गणेश मंदिराच्या सभा मंडपाचे भूमिपूजन माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या हस्ते मंगळवारी (दि. 17) करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते, युवा नेते विशाल आहेर, विशाल जाधव, राहुल आहेर, ज्ञानेश्वर बोऱ्हाडे, रुपाली आल्हाट, श्री. पोखरकर, श्री.कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### गव्हाणे यांच्या पुढाकारातून प्रश्न मार्गी – बोराटे

वसंत बोराटे यावेळी म्हणाले स्वराज्य हाउसिंग सोसायटीतील पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. कोणत्याही परिस्थितीत हा प्रश्न सोडवून मला नागरिकांना दिलासा द्यायचा होता. यासाठी वेळोवेळी गव्हाणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनातून या समस्येवर मार्ग निघाला. आज येथील 605 रहिवाशांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळवून दिले आहे. तसेच या ठिकाणी असलेल्या मंदिराला सभामंडप बांधण्याचे काम देखील आता सुरू होणार आहे. यामध्ये अजित गव्हाणे यांनी दाखवलेला सकारात्मक विश्वास, त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांच्या प्रशासकीय कामावरील हातोटीचा अनुभव आम्ही सर्वांनीच घेतला आहे.

# कुठे गेलं तुमचं हिंदुत्व?

## आदित्य ठाकरेंचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार आणि ‘बीसीसीआय’वर हल्लाबोल केला आहे. तसेच बांगलादेश आणि टीम इंडिया कसोटी मालिकेवरून आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारला काही सवाल केले आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी बांगलादेशमध्ये हिंदुंवर अत्याचार होत असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. त्याच मुद्यांवरून आदित्य ठाकरे यांनी सरकारला घेरलं आहे.**

“बांगलादेशचा क्रिकेट संघ भारत दौऱ्यावर आहे, त्यासाठी ‘बीसीसीआय’ने त्यांना पायघड्या घातल्या आहेत. हिंदूंवर बांगलादेशात अन्याय होत असताना त्यांच्या क्रिकेट संघाला भारतात येऊ देण्याच्या निर्णयामागे कोणाचा दबाव आहे? कुठं गेलं तुमचं हिंदुत्व?”, असे सवाल करत आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारसह ‘बीसीसीआय’वर घणाघाती टीका केली आहे.“बांगलादेशचा क्रिकेट संघ भारत दौऱ्यावर आहे. त्यासाठी ‘बीसीसीआय’ने त्यांना पायघड्या घातल्या आहेत. आता मी परराष्ट्र मंत्रालयाकडून जाणून घेण्यास उत्सुक आहे की, काही माध्यमं आणि सोशल मीडियात सातत्याने सांगितलं जात असल्याप्रमाणे गेल्या २ महिन्यात बांगलादेशातील हिंदूंवर अत्याचार होत असल्याच्या बातम्या खऱ्या आहेत का?, जर खऱ्या असतील तर हिंदूंवर बांगलादेशात अन्याय होत असताना त्यांच्या क्रिकेट संघाला भारतात येऊ देण्याच्या निर्णयामागे केंद्र सरकारवर कोणाचा दबाव आहे? आणि जर या बातम्या खोट्या असतील तर, सोशल मीडियातून आणि माध्यमातून पसरवल्या जाणाऱ्या या बातम्या (बांगलादेशात हिंदू समाजावर अत्याचार!) हा



भाजपाने भारतातल्या निवडणुका जिंकण्यासाठी आणि समाजात तेढ निर्माण करण्यासाठी निर्माण केलेला ‘जुमला’ तर नाही ना? हिंदूंवर जर बांगलादेशात खरंच अत्याचार होत असतील, तर भाजपा प्रणित केंद्र सरकार त्यांच्या क्रिकेट संघाला पायघड्या का घालतंय? कुठे गेलं ह्यांचं हिंदुत्व? की त्यांचं हिंदुत्व केवळ निवडणुकांसाठीच असतं?”, असे सवाल करत शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकार आणि ‘बीसीसीआय’वर हल्लाबोल केला आहे. दरम्यान, भारत आणि बांगलादेश यांच्यातील कसोटी मालिकेला १९ सप्टेंबरपासून सुरुवात होत आहे. दोन्ही संघांमध्ये या मालिकेत दोन कसोटी सामने खेळले जाणार आहेत. यामध्ये पहिला सामना चेन्नईत तर दुसरा कसोटी सामना २७ सप्टेंबरपासून कानपूरमध्ये खेळला जाणार आहे. मात्र, भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामन्यावरून आणि बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या घटनांचा मुद्दा उपस्थित करत आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे.शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार आणि ‘बीसीसीआय’वर हल्लाबोल केला आहे. तसेच बांगलादेश आणि टीम इंडिया कसोटी मालिकेवरून आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारला काही सवाल केले आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी बांगलादेशमध्ये हिंदुंवर अत्याचार होत असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. त्याच मुद्यांवरून आदित्य ठाकरे यांनी सरकारला घेरलं आहे. त्यासाठी ‘बीसीसीआय’ने त्यांना पायघड्या घातल्या आहेत. हिंदूंवर बांगलादेशात अन्याय होत असताना त्यांच्या क्रिकेट संघाला भारतात येऊ देण्याच्या निर्णयामागे कोणाचा दबाव आहे? कुठं गेलं तुमचं हिंदुत्व?”, असे सवाल करत आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारसह ‘बीसीसीआय’वर घणाघाती टीका केली आहे.

### ‘बीसीसीआय’वर हल्लाबोल केला

“बांगलादेशचा क्रिकेट संघ भारत दौऱ्यावर आहे. आता मी परराष्ट्र मंत्रालयाकडून जाणून घेण्यास उत्सुक आहे की, काही माध्यमं आणि सोशल मीडियात सातत्याने सांगितलं जात असल्याप्रमाणे गेल्या २ महिन्यात बांगलादेशातील हिंदूंवर अत्याचार होत असल्याच्या बातम्या खऱ्या आहेत का?शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत केंद्र सरकार आणि ‘बीसीसीआय’वर हल्लाबोल केला आहे. तसेच बांगलादेश आणि टीम इंडिया कसोटी मालिकेवरून आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारला काही सवाल केले आहेत.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर घ्या

## ‘एक देश एक निवडणुकी’वर राज ठाकरेंची प्रतिक्रिया

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्रिमंडळाने आज (१८ सप्टेंबर) ‘एक देश एक निवडणूक’ प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. आता या मंजुरीनंतर हिवाळी अधिवेशनात हे विधेयक संसदेत मांडलं जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, ‘एक देश एक निवडणूक’ प्रस्तावाच्या मंजुरीनंतर राजकारण तापलं आहे.**

या प्रस्तावासंदर्भात राजकीय वर्तुळातून अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. विरोधकांनी केंद्र सरकारवर या ‘एक देश एक निवडणुकीच्या प्रस्तावावरून जोरदार टीका केली आहे. यानंतर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील प्रतिक्रिया देत ‘एक देश एक निवडणूक’ प्रस्तावावरून अनेक सवाल उपस्थित केले आहेत. तसेच “निवडणुकांचं महत्व इतकंच वाटतंय तर या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर घ्या”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.“‘एक देश एक निवडणूक’ संकल्पनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली. अर्थात ही फक्त केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता आहे आणि अजून याला संसदेची मान्यता लागेल आणि अर्थात देशातील



प्रत्येक राज्याचा कौल पण विचारात घ्यावाच लागेल. या कौलचा अर्थ वरवरची मान्यता नाही तर अशा प्रकारांनी राज्यांच्या अधिकारांना, स्वायत्ततेला धक्का पोहचणार नाही, याची खातरजमा पण व्हायलाच हवी. बरं जर एखाद्या राज्यात सरकार कोसळलं किंवा तिथली विधानसभा बरखास्त झाली तर तिकडे आधी निवडणूक होणार का? त्या राज्याने लोकसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत वाट पहायची?

किंवा समजा काही कारणांनी लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका लागल्या तर देशातील सगळ्या निवडणुका परत होणार का? असा कुठलाच खुलासा झालेला नाही. तसेच ‘एक देश एक निवडणूक’ हे सर्व ठीक आहे. आधी राज्यातल्या महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुका घ्या.

### सामान्य माणसाने जायचं कोणाकडे?

येत्या ऑक्टोबर २०२४ मध्ये कित्येक महापालिकांमध्ये, नगरपालिकांमध्ये प्रशासक येऊन ४ वर्ष होतील. इतका काळ नगरसेवक नाहीत म्हणजे लोकप्रतिनिधी नाहीत. ते जास्त महत्वाचं नाही का? स्थानिक स्वराज्य संस्थांचा थेट संबंध सामान्य माणसांच्या जगण्याशी, त्यांच्या प्रश्नांशी असतो. त्याच्याच निवडणुका होत नसतील तर सामान्य माणसाने जायचं कोणाकडे? निवडणुकांचं महत्व इतकंच वाटतंय तर या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घ्या”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# भारताकडून व्यापारी संबंधात गैरवर्तवणूक

## ट्रम्प मोदींची लवकरच भेट घेणार असल्याचे केले सुतोवाच

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होणार आहे. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे निवडणुकीच्या प्रचारात सध्या दंग आहेत. मंगळवारी प्रचारादरम्यान बोलत असताना त्यांनी भारतावर टीका केली. भारताची धोरणे ही दोन्ही देशांच्या व्यापारी संबंधात अडसर ठरत असून भारताकडून गैरवर्तणूक होत असल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला. तसेच पुढच्या आठवड्यात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार असून या विषयावर चर्चा करू, असेही ते म्हणाले. मात्र ही भेट कुठे होणार आहे, याबाबत त्यांनी काही ठोस माहिती दिली नाही. ट्रम्प यांनी भारताच्या धोरणांवर टीका केली असली तरी मोदींचे मात्र त्यांनी कौतुक केले आहे.**

अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन २१ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलिया, भारत आणि जपानच्या नेत्यांची शिखर परिषद आयोजित करत आहेत. आशिया खंडात चीनचा प्रभाव मोडीत काढून भारत स्वतःचे स्थान निर्माण करत आहे, अशी भावना अमेरिकेतील तज्ज्ञ मंडळी व्यक्त करत आहेत. गेल्या काही महिन्यात अनेक देशांच्या प्रतिनिधींनी अमेरिकेचा दौरा केला असून जो बायडेन यांची भेट घेतली आहे. तसेच या नेत्यांनी आपल्या देशात परतत असताना ट्रम्प यांचीही भेट घेतली. ५ नोव्हेंबर रोजी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार आणि विद्यमान उपाध्यक्ष कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात सामना होणार आहे. कमला हॅरिस या भारतीय वंशाच्या असून त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्यात कडवी स्पर्धा आहे. पंतप्रधान मोदी २०१९ साली जेव्हा अमेरिकेत गेले होते. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांचे तोंडभरून कौतुक केले होते. टेक्सास येथील जाहीर सभेला ५० हजारांहून अधिक उपस्थितांची गर्दी जमलेली असताना ट्रम्प सर्वांसमोर 'हाऊडी मोदी' म्हणाले होते. मोदींनी मात्र डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते, माजी अध्यक्ष बराक ओबामा आणि जो बायडेन यांच्याशीही चांगले संबंध निर्माण केले होते. मागच्या वर्षी संरक्षण आणि वित्तीय क्षेत्राशी निगडित विविध सामंजस्य करार करण्यासाठी मोदी अमेरिकेत गेले असताना व्हाईट हाऊसने त्यांच्यासाठी लाल गालिचा अंथरला होता. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होणार आहे. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे निवडणुकीच्या प्रचारात सध्या दंग आहेत. मंगळवारी प्रचारादरम्यान बोलत असताना त्यांनी भारतावर टीका केली. भारताची धोरणे ही दोन्ही देशांच्या व्यापारी संबंधात अडसर ठरत असून भारताकडून गैरवर्तणूक होत असल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला. अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन २१ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलिया, भारत आणि जपानच्या नेत्यांची शिखर परिषद आयोजित करत आहेत. आशिया खंडात चीनचा प्रभाव मोडीत काढून भारत स्वतःचे स्थान निर्माण करत आहे, अशी भावना अमेरिकेतील तज्ज्ञ मंडळी व्यक्त करत आहेत.गेल्या काही महिन्यात अनेक देशांच्या प्रतिनिधींनी अमेरिकेचा दौरा केला असून जो बायडेन यांची भेट घेतली आहे. तसेच या नेत्यांनी आपल्या देशात परतत असताना ट्रम्प यांचीही भेट घेतली. ५ नोव्हेंबर रोजी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार आणि विद्यमान उपाध्यक्ष कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात सामना होणार आहे. कमला हॅरिस या भारतीय वंशाच्या असून त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्यात कडवी स्पर्धा आहे. पंतप्रधान मोदी २०१९ साली जेव्हा अमेरिकेत गेले होते. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांचे तोंडभरून कौतुक केले होते. टेक्सास येथील जाहीर सभेला ५० हजारांहून अधिक उपस्थितांची गर्दी जमलेली असताना ट्रम्प सर्वांसमोर 'हाऊडी मोदी' म्हणाले होते. मोदींनी मात्र डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते, माजी अध्यक्ष बराक ओबामा आणि जो बायडेन यांच्याशीही चांगले संबंध निर्माण केले होते. मागच्या वर्षी संरक्षण आणि वित्तीय क्षेत्राशी निगडित विविध सामंजस्य करार करण्यासाठी मोदी अमेरिकेत गेले असताना व्हाईट हाऊसने त्यांच्यासाठी लाल गालिचा अंथरला होता.

### स्वत:चे स्थान निर्माण करत आहे

अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन २१ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलिया, भारत आणि जपानच्या नेत्यांची शिखर परिषद आयोजित करत आहेत. आशिया खंडात चीनचा प्रभाव मोडीत काढून भारत स्वतःचे स्थान निर्माण करत आहे, अशी भावना अमेरिकेतील तज्ज्ञ मंडळी व्यक्त करत आहेत. गेल्या काही महिन्यात अनेक देशांच्या प्रतिनिधींनी अमेरिकेचा दौरा केला असून जो बायडेन यांची भेट घेतली आहे. तसेच या नेत्यांनी आपल्या देशात परतत असताना ट्रम्प यांचीही भेट घेतली. ५ नोव्हेंबर रोजी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार आणि विद्यमान उपाध्यक्ष कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात सामना होणार आहे. कमला हॅरिस या भारतीय वंशाच्या असून त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्यात कडवी स्पर्धा आहे.

# एक देश एक निवडणूकला काँग्रेसचा विरोध!

## काँग्रेसचे अध्यक्ष खरगे यांनीही या संकल्पनेवर केली टीका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळाला १०० दिवस पूर्ण झाल्यानंतर मंत्रिमंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. एक देश, एक निवडणूक या संकल्पनेला मोदी सरकारने मान्यता दिली आहे. भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने एक देश, एक निवडणूक हा कार्यक्रम राबविण्यासंदर्भातला अहवाल मार्च २०२४ रोजी केंद्राला सोपविला होता.**

त्यानंतर आज केंद्रीय मंत्रिमंडळाने या अहवालावर शिक्कामोर्तब केले. दरम्यान यावरून आता क्रिया-प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही या संकल्पनेवर टीका केली आहे. एक देश एक निवडणूक ही संकल्पना लोकशाहीत चालू शकत नाही. लोकशाही टिकवायची असेल तर जेव्हा हव्या तेव्हा निवडणुका व्हायला हव्यात, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. तसंच, इंडिया टीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, एकाचवेळी निवडणुका घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देणे ही निवडणुकीपूर्वीची एक खेळी आहे. जेव्हा निवडणुका येतात तेव्हा ते (भारतीय जनता पक्ष) या सर्व गोष्टी सांगतात. परंतु, देशातील जनताही हे स्वीकारणार नाही", असेही ते म्हणाले.

### जनतेकडूनही सूचना मागविल्या

पंतप्रधान मोदी यांचा दुसरा कार्यकाळ संपत असताना २ सप्टेंबर २०२३ रोजी कोविंद समिती नेमण्यात आली होती. तिने या विषयावर १९१ दिवस काम केले आणि १४ मार्च २०२४ रोजी १८,६२६ पानांचा अहवाल सादर केला. माजी मुख्य निवडणूक आयुक्त आणि राज्य निवडणूक आयुक्त, कायदेतज्ज्ञ अशा सगळ्यांकडून या समितीने सूचना मागवल्या. जनतेकडूनही सूचना मागविण्यात आल्या होत्या. बार कौन्सिल ऑफ इंडिया, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अशा सगळ्यांना त्यांचे मत मांडण्याची संधी देण्यात आली.

# मराठी गीतावर नारकर जोडप्याने धरला ठेका

ऐश्वर्या व अविनाश नारकर यांची जोडी कायम चर्चेत असते. या दोघांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. मराठी नाटक, चित्रपट आणि मालिका अशा तिन्ही माध्यमांमध्ये नारकर जोडप्याने आपला ठसा उमटवला आहे. हे दोघे सोशल मीडियावर कायम सक्रिय असतात. विविध ट्रेंडिंग गाण्यांवर रील्स व्हिडीओ बनवून हे दोघेही प्रेक्षकांचं मनोरंजन करतात.सध्या सोशल मीडियावर जुन्या गाण्यांची प्रचंड क्रेझ निर्माण झाली आहे. फेसुबक, इन्स्टाग्रामवर सध्या अनेक जुनी गाणी व्हायरल होत आहेत. १९६५ मध्ये 'केला इशारा जाता जाता' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटामधील 'हिशोब सांगते ऐका भाओजी, कसा खरचला पैका!' हे गाणं आजही सर्वत्र लोकप्रिय आहे. याच मराठी गाण्यावर ऐश्वर्या व अविनाश नारकर यांनी ठेका धरला आहे.ऐश्वर्या व अविनाश यांचा या व्हिडीओमध्ये मराठमोळा अंदाज पाहायला मिळत आहे. अभिनेत्रीने ऑफ व्हाइट रंगाची साडी नेसून, पदर खोचून या गाण्यावर व्हिडीओ बनवला आहे. तर, अविनाश नारकरांनी सदरा घालून डोक्यावर टोपी असा मराठमोळा लूक करत ऐश्वर्या यांना जबरदस्त साथ दिली आहे. या व्हिडीओला अभिनेत्रीने "हिशोब..." असं कॅप्शन दिलं आहे.ऐश्वर्या व अविनाश यांचा हा मराठमोळा अंदाज पाहून नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर लाइक्स आणि कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.
४ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहे. तितीक्षा तावडे आणि अजिंक्य ननावरेने या व्हिडीओवर "कडक..." अशी कमेंट केली आहे. तर, अश्विनी कासारने या व्हिडीओवर कमेंट करत "क्या बात..." म्हटलं आहे. याशिवाय अन्य काही नेटकऱ्यांनी "ढोलकी टायमिंग कमाल", "सरांनी ढोलकीवर एकदम मस्त ताल धरलाय", "खूप सुंदर... मला तुमच्या दोघांच्या REELS खूप आवडतात, त्यात हे गाणं मला खूपच आवडतं" अशा प्रतिक्रिया दोघांच्या व्हिडीओवर दिल्या आहेत.दरम्यान, दोघांच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर ऐश्वर्या नारकर सध्या 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' या 'झी मराठी'वरील मालिकेत खलनायिकेची भूमिका साकारत आहेत.

# तिच्या जागी दुसरं कोणी असतं तर



'बिग बॉस मराठी'च्या सातव्या आठवड्यात वैभव चव्हाण घराबाहेर झाला. त्यामुळे सध्या तो चर्चेत आहे. विविध एंटरटेनमेंट चॅनलशी संवाद साधत आहे. अलीकडेच वैभवने 'अल्ट्रा मराठी बझ' या एंटरटेनमेंट चॅनलला मुलाखत दिली. यावेळी त्याने एकंदरीत त्याच्या खेळाविषयी सांगितलं. तसंच आपलं काय चुकलं? कोण कसं आहे? याबद्दलही बोलला. शिवाय आर्या आणि निक्कीमध्ये नेमकं काय घडलं? याविषयी त्याने सांगितलं. दरम्यान, सातव्या आठवड्यातील जादूई हिरा या कॅप्टन्सी टास्क दरम्यान आर्या आणि निक्कीमध्ये वाद झाले. या वादाचे रुपांतरी काही वेगळात धक्काबुकी झाले. शेवटी रागाच्या भरात आर्याने निक्कीला कानशिलात लगावली. यामुळे तिला लगेच जेलमध्ये टाकलं आणि 'भाऊच्या धक्क्या'वर कठोर शिक्षा सुनावणार असल्याचं जाहीर केलं. त्यानुसार, शनिवारी झालेल्या 'भाऊच्या धक्क्या'वर 'बिग बॉस'ने आर्याला थेट घराबाहेर केलं. त्याच्याच दुसऱ्या दिवशी वैभव घराबाहेर गेला. घराबाहेर आल्यानंतर वैभव आर्या आणि त्या घटनेविषयी बोलला.तो म्हणाला, "मी तिथे होतो. पण मला अर्धी बाजू दिसली. कारण तो दरवाजा अर्धा बंद होता. त्यामुळे आतमध्ये काय घडलं हे माहित नव्हतं. फक्त एवढं दिसलं की आर्याने मारलं आणि ज्या काही गोष्टी घडल्या त्या रागाच्या ओघात घडल्या. मला असं वाटतंय मोठ्या नियमाचं उल्लंघन झालं. राग योग्य होता, एकमेकांना टिगर करणं योग्य होतं, एकमेकांबद्दल बोलणं ठीक आहे, टास्कमध्ये धक्काबुकी ठीक आहे.

# म्हणून यश जोहर शाहरुखला ओरडले

बॉलीवूडचे कलाकार हे विविध कारणांमुळे सातत्याने चर्चेत असतात. त्यांच्या चित्रपटातील भूमिका, सोशल मीडियावरील पोस्ट व मुलाखतीदरम्यान केलेली वक्तव्ये यांमुळे हे कलाकार चर्चांचा भाग असतात. आता अभिनेत्री अर्चना पूरन सिंहने एका मुलाखतीत शाहरुख खानबद्दलची आठवण सांगितली आहे.अभिनेत्री अर्चना पूरन सिंहने नुकतीच 'बॉलीवूड बबल'ला नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी 'कुछ कुछ होता है' या चित्रपटाच्या सेटवरील आठवणींना उजाळा दिला. या चित्रपटातील कोई मिल गया या गाण्याच्या शूटिंगची आठवण त्यांनी सांगितली आहे. त्यांनी म्हटले, "कुछ कुछ होता है या चित्रपटातील आम्ही कोई मिल गया या गाण्याचे शूटिंग मेहबूब स्टुडिओमध्ये करीत होतो. मला आठवतं की. या गाण्याचं शूटिंग कुठेतरी दुसऱ्या मजल्यावर सुरू होतं. मी पायांत हिल्सच्या चपला घातल्या होत्या.


# ट्रोल केतकीचं उत्तर

गायिका आणि अभिनेत्री केतकी माटेगावकर (KETAKI MATEGAONKAR) ही सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. केतकी ही तिचे विविध फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असते. अनेक नेटकरी केतकीच्या सोशल मीडियावरील पोस्टला कमेंट्स करतात. काही जण कमेंट्स करुन केतकीचं कौतुक करतात तर काही जण केतकीला ट्रोल करतात. केतकीनं नुकतीच एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून केतकीनं बॉडी शेमिंग करणाऱ्या आणि ट्रोलर्सला सडेतोड उत्तर दिलं आहे. केतकीनं सोशल मीडियावरील पोस्टमध्ये लिहिलं, "प्रिय लोकं, ज्यांना माझ्याप्रमाणे बॉडी शेमिंगचा सामना करावा लागतो, "किती बारीक आहेस गं", "अजून लहान मुलीचे कपडे घालतेस?","अरे खात जा जरा", "हं थंडी मानवलेली दिसतेय", "मागच्या वेळेस भेटलो तेव्हा छान बारीक होतास", आता पोट सुटलंय का जरा? नातेवाईक असो, ऑफिस मधले सहकर्मचारी असो, कोणीही असो...आपल्याला नेहमी या अशा वाक्यांना सामोरं जाव लागतं. "मी एवढं म्हणेन, यात मी तुमच्याबरोबर आहे. कारण मी हे रिलेट करु शकते. पण तुमच्या शरीराचा अभिमान बाळगा. तुम्ही सुंदर आणि युनिक आहात. देवाने दिलेल्या या वेगळेपणाला महत्त्व द्याजर एखादा डॉक्टर, आहारतज्ज्ञ, पालक किंवा तुमचे मित्र ज्यांना तुमची मनापासून काळजी असेल, तर तुम्हाला ते जे काही सांगत असतात, त्यांचं ऐका. अशा व्यक्तींचं ऐकू नाका जी तुम्हाला खाली खेचून इच्छिते किंवा तुमचं वाईट विचार करते.", असंही केतकीनं पोस्टमध्ये लिहिलं. पुढे केतकीनं लिहिलं, "डिअर ट्रोलर्स, शरीर आपल्याला देवाने दिलेली देणगी आहे. मी तुमच्या भाषेत, स्किनी, (हाडांचा सापळा) बारीक आहे.



# उर्फीचं इंस्टाग्राम सस्पेंड ; नेटकरी म्हणाले, "स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात"

अभिनेत्री उर्फी जावेद (URFI JAVED) चर्चेत नाही असा एकही दिवस जात नाही. अभिनेत्री अनेकदा हटके आणि अतरंगी फॅशन स्टाईलमुळे किंवा बोल्ड वक्तव्यामुळे चर्चेत असते. पण आता ती एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. उर्फीचं इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झालं आहे. पोस्ट शेअर करत तिने यासंदर्भात माहिती दिली आहे. अभिनेत्री उर्फी जावेदचं इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झालं आहे. अभिनेत्रीने स्वत: स्क्रीनशॉट सोशल मीडियावर शेअर केला आहे. उर्फीचं इंस्टाग्राम सस्पेंड झाल्याचा स्क्रीनशॉट सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. इंस्टाग्राम सस्पेंड झाल्याने उर्फीचे चाहते हैराण झाले आहेत. उर्फीने सोशल मीडियावर इंस्टाग्राम अकाऊंट सस्पेंड झाल्याचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. उर्फीने आता तिचं अकाउंट रिकवर केलं आहे. तिने शेअर केलेल्या स्क्रीनशॉटवर मेटाने दिलेली माहिती दिसत आहे. कम्यूनिटी गाइडलाइन्सचं




पालन न केल्याने इंस्टाग्राम अकाउंट सस्पेंड झाल्याचं यात म्हटलं आहे. तर उर्फीने स्क्रीनशॉट शेअर करत लिहिलं आहे, उर्फीची अतरंगी फॅशन काही चाहत्यांच्या पसंतीस उतरते. तर अनेकदा यामुळे मोठ्या प्रमाणात तिला ट्रोल केलं जातं. उर्फीला अनेकदा गंभीर धमक्या मिळाल्या आहेत. जीवे मारण्याच्या धमकीपासून ते रेपपर्यंतच्या धमक्या तिला मिळाल्या आहेत. ट्रोलर्सकडे उर्फी दुर्लक्ष करत आपल्या कामावर फोकस करत असते. उर्फी जावेदच्या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. एकाने लिहिलं आहे,"ही गंभीर बाब आहे". एका क्रिएटरसाठी सोशल मीडिया अकाउंट खूप महत्त्वाचं असतं. या दिवसाची मी आतुरतेने वाट पाहत होतो. खूप चांगला निर्णय, स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात". तर काहींनी मात्र 'मिस यू उर्फी' अशा कमेंट्स केल्या आहेत. उर्फी जावेद हिंदी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. उर्फी आता सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असली तरी छोटा पडदा मात्र तिने चांगलाच गाजवला आहे. दुर्गा, सात फेरों की हेराफेरी, बेपनाह, जीजी मां, डायन, ये रिश्ता क्या कहलाता है, पंच बीट सीझन 2, कसौटी जिंदगी की अशा अनेक मालिकांच्या माध्यमातून ती प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.

# मी राजकारणात येणार नव्हते!

## परिस्थिती बदलण्यासाठी तुम्हाला राजकारणात यावे लागेल

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक गमावल्यानंतर विनेश फोगटने कुस्तीतून निवृत्ती जाहीर केली. भारतात परतल्यावर तिने कुस्तीत परत येण्याचे संकेत दिले होते, पण काही दिवसांनी तिने काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याची बातमी आली. आता ती हरियाणा विधानसभा निवडणुकीत जुलाना मतदारसंघातून काँग्रेसची उमेदवार आहे.कुस्तीतून निवृत्ती घेतल्यानंतर विनेशला तिचा निर्णय बदलण्याची, एनजीओ उघडण्याच्या, करोडो रुपयांचे प्रायोजकत्व मिळवण्याच्या ऑफर आल्या होत्या, पण तिने राजकारणी होण्याचा निर्णय का घेतला? याबाबत तिने इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना खुलासा केला.**





पदक गमावल्यापासून आतापर्यंतचा राजकीय अनुभव कसा आहे? असे विचारल्यावर विनेश फोगट म्हणाली, ‘मी राजकारणात न येण्याचा निर्णय घेतला होता. पण जेव्हा मी या मोठ्या लढ्याचा (निषेध) सामना करत होते, तेव्हा मला जाणवले की परिस्थिती बदलण्यासाठी तुम्हाला राजकारणात यावे लागेल. मी राजकारणात आल्यावर माझ्याबद्दलची लोकांची सद्भावना संपेल, असे काहींनी मला सांगितले होते.’विनेश फोगट पुढे म्हणाली, ‘पण तसे झाले नाही. मला एका मुलीसाठी आणि सूनेसाठी लोकांच्या भावना दिसत आहेत. यामध्ये विशेषत: महिलांकडून प्रेम आणि आदर वाढला आहे. त्या मला मिठी मारून आशीर्वाद देत आहे. राजकारणात येणे हा मोठा निर्णय होता, ही ईश्वराची इच्छा होती. त्यामुळे मी माझ्या नशिबाला अनुसरुन पावले टाकत आहे.’पॅरिस ऑलिम्पिक पदक गमावणे की ब्रिजभूषण सिंग सारख्या शक्तिशाली राजकारण्याविरुद्ध तुमचा निषेध, कोणत्या गोष्टीने लोकांच्या मनात स्थान निर्माण केले? यावर विनेश फोगट म्हणाली, ‘मला वाटते निषेध. कारण लोकांना वाटते की आम्ही जे केले ते त्यांच्या मुली आणि त्यांच्या कुटुंबासाठी केले होते. तसेच ऑलिम्पिकमधील यश ही वैयक्तिक गोष्ट आहे.’कुस्तीपटू पुढे म्हणाली, ‘जेव्हा आपण इतरांसाठी काही करतो, तेव्हा लोक तुमच्यावर प्रेमाचा वर्षाव करतात. मला इतक्या प्रेमाची आणि पाठिंब्याची अपेक्षा नव्हती. आम्ही आंदोलन करत होतो, तेव्हा लोक येत-जात होते. पण ते शेतकरी आंदोलनासारखे जनआंदोलन ठरु शकले नाही, जिथे एका मोठ्या गटाने दोन वर्षे आंदोलन केले होते. आमचा लढा हा प्रत्येकाचा लढा नव्हता हे लक्षात आले. लोकांच्या स्वतःच्या मजबुरी आहेत, त्यांना नोकरी आणि वैयक्तिक बाबी हाताळाव्या लागतात.’पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक गमावल्यानंतर विनेश फोगटने कुस्तीतून निवृत्ती जाहीर केली. भारतात परतल्यावर तिने कुस्तीत परत येण्याचे संकेत दिले होते, पण काही दिवसांनी तिने काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याची बातमी आली. आता ती हरियाणा विधानसभा निवडणुकीत जुलाना मतदारसंघातून काँग्रेसची उमेदवार आहे.कुस्तीतून निवृत्ती घेतल्यानंतर विनेशला तिचा निर्णय बदलण्याची, एनजीओ उघडण्याच्या, करोडो रुपयांचे प्रायोजकत्व मिळवण्याच्या ऑफर आल्या होत्या, पण तिने राजकारणी होण्याचा निर्णय का घेतला? याबाबत तिने इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना खुलासा केला. पदक गमावल्यापासून आतापर्यंतचा राजकीय अनुभव कसा आहे? असे विचारल्यावर विनेश फोगट म्हणाली, ‘मी राजकारणात न येण्याचा निर्णय घेतला होता. पण जेव्हा मी या मोठ्या लढ्याचा (निषेध) सामना करत होते, तेव्हा मला जाणवले की परिस्थिती बदलण्यासाठी तुम्हाला राजकारणात यावे लागेल. मी राजकारणात आल्यावर माझ्याबद्दलची लोकांची सद्भावना संपेल, असे काहींनी मला सांगितले होते.’विनेश फोगट पुढे म्हणाली, ‘पण तसे झाले नाही. मला एका मुलीसाठी आणि सूनेसाठी लोकांच्या भावना दिसत आहेत. यामध्ये विशेषत: महिलांकडून प्रेम आणि आदर वाढला आहे. त्या मला मिठी मारून आशीर्वाद देत आहे. राजकारणात येणे हा मोठा निर्णय होता, ही ईश्वराची इच्छा होती. त्यामुळे मी माझ्या नशिबाला अनुसरुन पावले टाकत आहे.’पॅरिस ऑलिम्पिक पदक गमावणे की ब्रिजभूषण सिंग सारख्या शक्तिशाली राजकारण्याविरुद्ध तुमचा निषेध, कोणत्या गोष्टीने लोकांच्या मनात स्थान निर्माण केले?

### आमचा लढा हा प्रत्येकाचा लढा


यावर विनेश फोगट म्हणाली, ‘मला वाटते निषेध. कारण लोकांना वाटते की आम्ही जे केले ते त्यांच्या मुली आणि त्यांच्या कुटुंबासाठी केले होते. तसेच ऑलिम्पिकमधील यश ही वैयक्तिक गोष्ट आहे.’कुस्तीपटू पुढे म्हणाली, ‘जेव्हा आपण इतरांसाठी काही करतो, तेव्हा लोक तुमच्यावर प्रेमाचा वर्षाव करतात. मला इतक्या प्रेमाची आणि पाठिंब्याची अपेक्षा नव्हती. आम्ही आंदोलन करत होतो, तेव्हा लोक येत-जात होते. पण ते शेतकरी आंदोलनासारखे जनआंदोलन ठरु शकले नाही, जिथे एका मोठ्या गटाने दोन वर्षे आंदोलन केले होते. आमचा लढा हा प्रत्येकाचा लढा नव्हता हे लक्षात आले.

# विराटचे तीन ट्वीट चाहत्यांसाठी ठरले कोडे

## बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी तीन ट्वीट केले

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील दोन सामन्यांची कसोटी मालिका १९ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे. या मालिकेला सुरुवात होण्यापूर्वी एक दिवस आधी टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली चर्चेत आला आहे. तो बुधवारी सकाळी एक्सवर तीन शब्द ट्वीट केल्यानंतर चर्चेत आला आहे. जे पाहून चाहतेही गोंधळले.**



विराटने हे तीन ट्वीट कोणावर केले हे चाहत्यांना समजू शकलेले नाही. काही चाहत्यांनी असेही विचारले आहे की, एवढ्या सकाळी अशा प्रकारचे शब्द ट्वीट करण्याचे काय कारण आहे? विराट कोहली बहुतेक सोशल मीडियावर जाहिराती पोस्ट करतो किंवा तो त्याच्या चाहत्यांसह क्रिकेटशी संबंधित पोस्ट देखील शेअर करतो. परंतु बुधवारी सकाळी-सकाळी त्याने केलेल्या चार ट्वीटने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. विराटने हे तीन ट्वीट कोणाबद्दल केले हे चाहत्यांना समजू शकलेले नाही. विराट कोहलीने एका पाठोपाठ एका ट्विटमध्ये (महिलांचा आदर करणारे पुरुष),असे लिहिले असले तरी याशिवाय विराटने दुसरी कोणतीही पोस्ट केलेली नाही.

विराट कोहलीने यावर्षी फक्त एकच कसोटी सामना खेळला आहे. गेल्या वर्षाच्या अखेरीस टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा दौरा केला होता आणि या दौऱ्यावर विराटने शेवटचा कसोटी सामना खेळला होता. त्यानंतर विराट कोहली त्याच्या दुसऱ्या मुलाच्या जन्मासाठी पत्नी अनुष्का शर्मा आणि मुलगी वामिकासोबत होता.

### ग्रीनपार्क स्टेडियमवर दुसरा कसोटी

यादरम्यान त्याने ४९.१५ च्या सरासरीने ८८४८ धावा केल्या आहेत. विराट कोहलीच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये एकूण २९ शतके आहेत. भारत आणि बांगलादेश यांच्यातील दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना १९ सप्टेंबरपासून चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. यानंतर २७ सप्टेंबरपासून कानपूरच्या ग्रीनपार्क स्टेडियमवर दुसरा कसोटी सामना खेळवला जाणार आहे.